# धर्म : एक टिपण

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - समाज प्रबोधन पत्रिका, संपा. भालचंद्र भणगे, प्रकाशक - ग प्र प्रधान, पुणे, जुलै-ऑगस्ट १९६९)
(विविध तज्ज्ञांनी केलेल्या विवेचनापैकी केवळ डॉ. रानडे ह्यांच्या विवेचनाचा भाग इथे उद्धृत केला आहे.)

**५. अशोक दामोदर रानडे**

प्रा. पुंडलिकांचा मुख्य मुद्दा मान्य होण्यासारखाच आहे. धर्मकल्पनेच्या कक्षा इतक्या विस्तृत आहेत की, त्यामुळे समाजाच्या विविध थरांतील आणि बुद्धिवादित्वाच्या बाबतीतही वेगवेगळ्या पातळ्यांवर असणाऱ्या अनेकांना धर्मकल्पनेचा आधार घेता येतो. देवविरहित धर्मकल्पनांना ही शक्ती नसते याचे कारण काय? याचे कारण, अतिमानवी शक्तींच्या अस्तित्त्वाला वा पारलौकिकाला मान्यता देण्याचे देवविरहित धर्मकल्पनांना मुळातच मानवणारे नाही, हे असावे. प्रा. पुंडलिकांनी हेही चांगले स्पष्ट केले आहे. सामूहिक तत्त्वज्ञान निर्माण करणारे पंथ मिथचा आश्रय घेतात, हे प्रा. पुंडलिकांचे म्हणणे मात्र योग्य वाटत नाही. 'कम्यून्सची स्थापना', इ.ना मिथ म्हणताना आपण त्यांचे अस्तित्व प्रत्यक्षात शक्य होत नाही, त्यांना व्यवहारात उतरविणे जमत नाही असा व्यावहारिकतेचा, शक्याशक्यतेचा निकष लावीत असतो. उलटपक्षी, 'पुनरुत्थान' वा 'पुनर्जन्म' यांना मिथ म्हणत असता ‘पारलौकिक शक्तींच्या वा अतिमानवी सामर्थ्याच्या बळावरच ज्यांचे अस्तित्व अवलंबून असते त्या मिथ’ अशी काहीतरी व्याख्या आपल्या मनात असते. तेव्हा, सामूहिक निधर्मी तत्त्वज्ञानाच्या संदर्भातील आणि धार्मिक संदर्भातील मिथ ही संकल्पना वेगवेगळ्या दिशेने मुक्त (ओपन एन्डेड) आहे असे मला वाटते.

प्रा. पुंडलिकांच्या टिपणाच्या संदर्भात आपल्या समाजातील (एका सहजासहजी लक्षात येणाऱ्या) वर्तमान प्रवृत्तीचाही उलगडा होईलसे वाटते. सुशिक्षित परंतु कर्मकांडावर, विधींवर विश्वास; एरवी इंग्रजाळलेल्या लोकांवरही अध्यात्मिक गुरू आणि त्यांनी केलेले चमत्कार यांचा सरसकट पडणारा प्रभाव; या विरोधाचा उलगडा होण्यास धर्मकल्पनेच्या विस्तृतपणाची संकल्पना साहाय्यक ठरेल. हे इतके 'इररॅशनल एलिमेंट' माणसात असावयाचेच, आणि त्याला नीट मार्गी लावण्यास धर्मकल्पनाच उपयोगी पडते असा निष्कर्ष कोणी काढू शकेल. आपल्यातील विशिष्ट दुबळेपणासाठी निर्धोक आधार म्हणजे धर्म, वा सध्या बुद्धिगम्य नसलेल्या घटनांचा अन्वयार्थ लावण्याचा अनैसर्गिक ताण मानवी क्षमतेवर पडू नये या दिशेने केलेला सर्वसमावेशक प्रयत्न म्हणजे धर्म, अशी जाणीव होऊन आमचा सुशिक्षित जर 'धार्मिक' बनला तर आत्तापेक्षा सामाजिकदृष्ट्या हे स्वागतार्ह होईल काय? असा प्रश्नही प्रा. पुंडलिकांच्या टिपणातून उद्भवतो. बुद्धिवाद आणि तर्क (रीझन) यांच्या मर्यादांची जाणीव करून घेणे हेच कदाचित् आजच्या धर्म वा निधर्म कशाचेच आकलन न झालेल्या काळात उपयुक्त ठरेल.